नि.दि.दावा क्र. १०३/२००७
निशाणी क्र. ६२ पुढे सुरु...

<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा शपथेवरील उलटतपास प्रतिवादी क्र. १, ३, ४, ५ व १० तर्फे अधिवक्ता श्री. व्ही. आर. पाटील यांचेकडून....</u>

९. माझ्या वडीलांना एकूण ५ बहिणी असून त्यांची नावे तुळसाबाई, जनाबाई, मैनाबाई, नागुबाई व सुंदराबाई अशी आहेत. या सर्व बहिणी मरण पावल्या आहेत. त्या सर्व विवाहीत होत्या. तुळसाबाई हिचा विवाह फार पूर्वी म्हणजे माझ्या जन्माच्याही आधी झाला होता. त्यामुळे तिच्या विवाहाची तारीख मला सांगता येणार नाही. तुळसाबाई ही सुमारे २० वर्षांपूर्वी मरण पावली आहे. तुळसाबाई, मैनाबाई, नागुबाई व सुंदराबाई या सर्वांचा विवाह फार पूर्वी म्हणजे माझ्या जन्माच्याही आधी झाल्या आहेत. ८ वर्षांपूर्वी या सर्व बहिणी कालांतराने मरण पावल्या आहेत. वादी क्रमांक ३ नामदेव हा मयत मैनाबाई हिचा नातू होय. वादी क्रमांक ४ वैजू हा जनाबाई हिचा मुलगा आहे. हे खरे की, वैजू व्यतिरिक्त जनाबाई हिला आणखी ३ मुले असून ते सर्व वेगवेगळे राहतात. वादी क्रमांक ६ पांडुरंग हा तुळसाबाई हिचा मुलगा आहे. हे खरे की, तुळसाबाई हिस पांडुरंग व्यतिरिक्त आणखी ३ मुले असून ते ही सर्व विभक्त राहतात. वादी क्रमांक ७ वैजू हा मयत सुंदराबाई हिचा मुलगा आहे. सुंदराबाई हिचे पती आज हयात नाहीत. वादी क्रमांक २ ते ७ यांनी मला त्यांचेवतीने सुध्दा या प्रकरणात मौखिक पुरावा देण्यासाठी कोणताही लिखीत अधिकार पत्र दिलेला नाही. हे खरे की, वादी क्रमांक ३ ते ७ यांचा माझ्या वैयक्तिक कुटूंबाशी व वाद मिळकतींशी काहीएक संबंध नाही. हे खरे नाही की, मी या दाव्यात वादी क्रमांक २ ते ७ यांना गैरहक्काने पक्षकार म्हणून सामील केला असून हा दावा त्यास अनुसरूण चुकीचा आहे. हे खरे नाही की, यापूर्वी वाद मिळकतींची वाटणी झाली आहे. हे खरे नाही की, असे असताना केवळ प्रतिवादींना त्रास देण्यासाठी मी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे.

१०. हे खरे की, माझे व प्रतिवादींचे घर हे स्वतंत्र असून आम्ही सर्व वेगवेगळे राहतो. हे खरे की, सन १९५६ पासून आमचे व प्रतिवादींचे विभक्त राहणे सुरु झाले. हे खरे की, आमच्या व प्रतिवादींच्या शिधापत्रीका स्वतंत्र आहेत. हे खरे की, आमचे व प्रतिवादींचे व्यवहार वेगवेगळे आहेत.

प्रतिवादींच्या विधिज्ञांच्या मौखिक विनंतीवरुन पुढील ऊलटतपास पुढील तारखेपर्यंन्त आस्थगीत करण्यात येत आहे.

श्रवणोत्तर स्विकृत
समक्ष,

स्वाक्षरी/–
(अमृत चं. बिराजदार)
दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड.

दिनांक: १४.०६.२०१९

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.G. Kamble, L. G. Stenographer. |
| Name of Court | Shri. A. C. Birajdar,<br>Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Chandgad. |
| Date of Dictation | 14/06/2019 |
| order signed by the P. O. on | 14/06/2019 |
| order uploaded on | 21/06/2019 |